

Given at the hands of Dr. S. S. Magar, Vice Chancellor, KKV, Dapoli. Received by Bhavarlal H. Jain



# Doctor of Science – 2006



महाराणा प्रताप कृषि एवं प्रौद्योगिकी विश्वविद्यालय

The Degree of

Doctor of Science (Honoris causa) is

Conferred upon

Shri Bhavarlal Hiralal Jain

for his outstanding contributions to

Agricultural Science & Technology

( Smt. Pratibha Patil )
Chancellor

( Shanti Lal Mehta )
Vice-Chancellor

October 16, 2006



Maharana Pratap University of Agriculture and Technology, Udaipur

Citation

Shri Bhavarlal Hiralal Jain
Chairman
Jain Irrigation Systems Ltd., Jalgaon (Maharashtra)

Shri Bhavarlal Hiralal Jain, born in 1937 in a poor farmers family at Vakod, Maharashtra, graduated and cleared Maharashtra State Services Examination but decided not to join the service and entered business initially to sale products related to agriculture. Later, in 1978 he bought a company and decided to process papain and was successful in exporting highly active papain. Then in 1986 he moved into plastic pipe manufacturing and subsequently into micro-irrigation systems, plastic sheets etc. In 90's he moved into food processing including onion dehydration, Mango & Banana pulp and following which state of the art facility for tissue culture of banana was established. Jain Hi-tech Agri-Institute establishment is another feather in his cap. Today he is the Chairman of Jain Irrigation Systems Limited. He is a self made Industrialist who has worked for economic empowerment of farmers. His business is driven more by ideology than by profits.

Shri Jain has received many honours and awards for his contributions to micro-irrigation systems nationally and internationally. Chief among these are, Udhyog Vibhushan (1992), Crawford Reid Memorial Award (1997) from Irrigation Association, USA, Gandhi Ambedkar Social Justice Award (2003), Agricultural Technologist Ratna (2004) and Degree of Doctor of Science (Honoris causa) from Dr. B.S. Konkan Krishi Vidhyapeeth Dapoli and Doctor of Letters from North Maharashtra University, Jalgaon.

The Maharana Pratap University of Agriculture and Technology, Udaipur feels proud and privileged to confer the degree of Doctor of Science (*Honoris causa*) on Shri Bhavarlal Hiralal Jain.

"Outstanding contributions in developing systems of Micro Irrigation, Food Processing and Tissue Culture facilities and bringing economic empowerment of farmers"

*Instituted by Maharana Pratap University of Agriculture and Technology, Udaipur, Rajasthan*



**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

## गौरवपत्र

**मा. श्री. भवरलालजी जैन,**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवीदिल्ली यांनी देशातील सर्वोकृष्ट कृषि विद्यापीठाचे पारितोषिक (१९९७) दिलेले हे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ 'कृषि व जलसिंचन, फलोद्यान आणि ठिबकसिंचन' क्षेत्रात संस्मरणीय व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आपणांस 'डॉक्टर ऑफ सायन्स' (D.Sc.) ही सर्वोच्च बहुमानाची पदवी प्रदान करून आपला सन्मान करीत आहे. अशा प्रकारे कोंकणचे सुपुत्र कै. पी. के. उर्फ बाळासाहेब सावंत यांनी घेतलेल्या सामाजिक बांधिलकीचा वसा पुढे चालवितांना विद्यापीठास विशेष आनंद व उल्हासाची अनुभूति होत आहे.

आपला जन्म दुष्काळाच्या छायेत असलेल्या छोट्याश्या 'वाकोद' (ता. जामनेर, जि. जळगांव) या खेडेगावात एका सर्वसाधारण कुटुंबात झाला. निरक्षर माता व अल्पशिक्षीत पिता यांच्या संस्कारातून मिळालेली संस्कारक्षम एकात्मतेची भावना हीच आपली अलौकिक शिदोरी व संपत्ती. लोकजीवनातून अनुभवलेली संस्कृती, शेती-मातीवर प्रेम, कष्टकऱ्यांच्या श्रमातून पाहिलेला कर्मसंस्कार आण गरिबांचे अश्रू पुसण्याची धडपड हे आपल्या जीवनाचे विशिष्ट पैलू. 'वाकोद' सारख्या खेडेगावात रुजलेले कसदार बी, जोमदार रोपट्याच्या रूपाने जळगांव येथील माध्यामक शिक्षणात बहरले आणि मुंबई येथील उच्च शिक्षणाने वटवृक्षासारखे विशाल झाले. विविध पदव्यांनी विभूषित असूनही शहरी जीवनाकडे पाठ फिरवित, मिळालेल्या राजपत्रित नोकरीच्या मागे न लागता कृषि उद्योग-व्यवसाय करण्याचा धाडसी निर्णय आपण त्याकाळी घेतला. सुरूवात अल्प भांडवलातून केलीत. स्वप्नातला बलशाली भारत खेड्यातून वाढेल हा आपला दृढ विश्वास आहे. 'खेड्याकडे चला' हा महत्मा गांधीजींचा संदेश आपण सळसळत्या उत्याहाने कृतीत उतरवला, महत्प्रयासाने, पराकाष्ठेने, श्रमसंकल्पनेने, यशाने न हुरळता, अपयशाने न खचता, जळगावस्थित आपल्या उद्योगांमार्फत कर्मभूमीचे नाव जगाच्या नकाशावर करण्याचे महान कार्य आपण केलेत.

आपल्या कतृत्वाचा 'शेती व शेतकरी' केंद्रबिंदू ठरला. शेती अवजारे, कीटकनाशके, बी-बियाणे, ट्रॅक्टर अशा शेती साधनसामुग्रीच्या व्यवसायाने आपण सुरूवात केली. परंतु खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हृदयाचे सम्राट झालात ते 'ठिबक सिंचन' या आपल्या देशात ओनामा करूनच! माळरानाचं रूपांतर नंदनवनात केले. देशाच्या कानाकोपऱ्यात विविध पिकांना वरदानीत करून आपण भूमिपुत्रांचे मूक आशीर्वाद पदरात घेतलेत. ग्रामस्थांच्या हातांना काम आणि शेत मालाला दाम देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचा झरा निर्माण केलात!

आपली कृषि आधारित औद्योगिक वाटचाल (१९७८) सुरू झाली ती केळ पावडरच्या आजारी कारखान्यामध्ये पपई चिकापासून पेपेन बनविण्याच्या उद्योगातून. पण व्यापक प्रमाणात देशभर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हृदयात आपण स्थानापन्न झालात ते पीव्हीसी पाईपच्या १९८० मध्ये सुरू झालेल्या प्रकल्पाने. त्यानंतर आपली ठिबक सिंचनाची संकल्पना मात्र संबंध देशाला पाणी नियोजनाबद्दल नवीन दिशा देणारी संजीवनीच ठरली. आजमितीस देशात १० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र आपल्या जैन ठिबक तंत्रज्ञानाच्या आधारे ओलिताखाली आहे. महाराष्ट्र आण कोकणभूमि त्यात अग्रेसर आहे. आपणांस लोकांचे अलोट प्रेम आणि लोकाश्रय मिळाला. १९९४ मध्ये श्रीगणेशा केलेली केळीची ऊतीसंवर्धित रोपे अल्पवधीत देशभर लोकप्रिय झाली व त्याचेही क्षेत्र २४ हजार एकरावर पोहोचून वाढत आहे. प्रगल्भ दूरदृष्टीतून उत्पादित मालावर प्रक्रिया करण्याच्या यशस्वी उद्योग आपण राबविला. आबां, आवळा,केळी, पेरू फळावरील प्रक्रियांचा आशियाई खंडातील मोठा प्रकल्प सूरू करण्याचे आपले स्वप्न पूर्ण झाले. कांडी कोळशापासून ठिबक सिंचनापर्यंतचा आपला प्रवास हा ग्रामीण व कृषि जीवनाशी आपल्या बांधिलकीचा जणु जिवंत व ज्वलंत आलेख आहे.

कृषि तंत्रज्ञान आण कृषि माहिती प्रसारण हे आपले आवडते विषय! आपल्या प्रयोगशील प्रवृत्तीने मोहाडीसारख्या उजाड माळाचा 'कृषि पंढरी' म्हणून उदय झाला. फळपिकांची लाखो झाडे, जागतिक दर्जाच्या जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळा, अत्याधुनिक हरित व शीतगृहे, आदर्श पाणलोट क्षेत्र आणि अद्ययावत फळप्रक्रिया प्रकल्प उभे राहिले. आपल्या अशा दिव्य दृष्टीची फळे आपण सदर प्रकल्पांच्या प्रचार-प्रसाराने सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविली.

वाचन, चिंतन आणि मार्मिक लेखन यांचा छंद म्हणून नव्हे तर उत्तम जीवनाचे अंग म्हणून स्वीकार करून आपण सुसंस्कारित झाला. चिंतनशील कृषि व्यवसायापासून ते गांधी आंबेडकर सामाजिक न्याय मंचापर्यंत आपण आयुष्यभर ताठ मानेने उभे आहात. आतापर्यंत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील १३१ पुरस्कार पटकावित आपण एक उच्चांक गाठला आहे. यामध्ये फाय फाऊंडेशन, जमनालाल बजाज आणि गांधी आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार हे आपल्या परस्कार मुकूटावरील हिरे-माणके आहेत. यांच्यावर कळस चढविण्याचे काम केले ते नामांकित अमेरिकन सिंचन आयोगाच्या 'ठिबक सिंचन' पुरस्काराने. हा पुरस्कार मिळणारे आपण पहिले भारतीय आहात, याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. कोंकण ही परशुरामाच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली निसर्गसंपन्न भूमी आहे. प्रचंड जलसंपत्तीचा वारसा तिच्याजवळ आहे. जलसंधारण आणि सूक्ष्मसिंचनाद्वारे जलव्यवस्थापन ही या भूमीची भूक भागल्यास शेतीमध्ये जगात कोंकण अग्रेसर राहील. आधुनिक कृषि तंत्रज्ञान प्रसारण हे या भूमिला निश्चितपणे अमृत ठरेल.

आपल्या आयुष्यात संकल्प आहे, संकटांशी सामना आहे, संघर्ष आहे, सार्वजनिक विचार आहे; विशेष म्हणजे समतोल आहे. कठोर परिश्रम, पारदर्शकता, वैचारिक प्रगल्भता, नैतिकता ही आपली जीवनमूल्ये निश्चितपणे सर्वांनाच मार्गदर्शक ठरतात. देशाला आपल्यासारख्या कृतिशील विचारवंताची गरज आहे. म्हणूनच या विचारांचा, त्या प्रत्यक्षात आणणाऱ्या कृतीचा आण पर्यायाने आपल्यासारख्या कृषिकेन्द्रीत कृतिशील विचारवंताचा हा मन:पूर्वक गौरव.

मा. कुलपती तथा महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य; कार्यकारी परिषद आणि विद्या परिषद, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ यांच्यावतीने, आपल्या आरोग्य संपन्न दीर्घायुष्याची प्रार्थना करून सहर्ष मनाने हे गौरवपत्र आपणांस प्रदान करतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कृपया, या गौरवाचा आपण स्वीकार करावा.

**डॉ. एस. एस. मगर,**
*कुलगुरू*